ठळक बातम्या

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज दुसऱ्या टप्प्यातल्या पद्म पुरस्कारांचं वितरण

- एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ तसंच वार्षिक वेतनवाढीचा दर तीन टक्के करण्याची परिवहन मंत्र्यांची घोषणा

- नाफेडच्या लिलाव पोर्टलचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

आणि

- राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय; येत्या दोन दिवसांत मुंबईसह राज्याच्या आणखी काही भागांत पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल

<><><><><>

राष्ट्रपती भवनात आज संध्याकाळी होणाऱ्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान केले जातील. पद्म पुरस्कार सोहळ्याच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती ६५ मान्यवरांचा पद्म पुरस्कार देऊन सन्मान करतील. टेनिसपटू विजय अमृतराज, अभिनेता मामुटी, पार्श्वगायिका अलका याज्ञिक आणि क्रिकेटपटू रोहित शर्मा या मान्यवरांचा यात समावेश आहे.

यावर्षी केंद्र सरकारनं एकूण १३१ पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून, यात ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कार विजेत्यांमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ जणांना मरणोत्तर सन्मानित केलं जाईल.

<><><><><>

महाराष्ट्रात वीज निर्मिती केंद्राला पुरवला जाणारा कोळसा काही प्रमाणात निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे वीज निर्मिती संचात बिघाड होत असून कोळसा पुरवठ्याबाबत नव्याने निविदा काढल्या जातील, तेव्हा पुरवठादार निकृष्ट मालाचा

पुरवठा करणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला ते विधानसभेत उत्तर देत होते. राज्यात वीज निर्मिती केंद्रातले संच वारंवार बंद पडत आहेत याकडे वडेट्टीवार यांनी सभागृहाचं लक्ष वेधलं. अधिक क्षमतेचे वीज निर्मिती संच उभे करणार का, असा प्रश्न त्यांनी विचारला, त्यावर चंद्रपूर येथे ८०० मेगावॉट सुपर क्रिटिकल प्रकल्पाबाबत पाहणी सुरू असल्याची माहिती सरकारने दिली.

<><><><><><>

राज्यात वाघांची संख्या वाढत असून, सरकारने वाघांचं पुनर्वसन अथवा अन्य ठिकाणी स्थलांतर याबाबतचं आपलं धोरण स्पष्ट करावं, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे केली. विदर्भातल्या चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वन्यजीव आणि मानव यांच्यातला संघर्ष गंभीर स्वरूप धारण करत असून, याबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, तसंच वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या पात्र कुटुंबियांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कायमस्वरूपी नोकरी द्यावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

<><><><><><>

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यावरून ५८ टक्के करायचा निर्णय घेतल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत केली. या कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता 8-१६-२४वरून १०-२०-३० टक्के, तर वार्षिक वेतनवाढीचा दर २ वरून ३ टक्के करायची घोषणाही त्यांनी केली. महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक दरवाढीसह सर्व मिळून प्रलंबित असलेली सुमारे ५ हजार ६४९ कोटी रुपयांची रक्कम लवकर अदा करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असेल, असं आश्वासन यांनी

दिलं. यानंतर २९ जून रोजी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेलं धरणं आंदोलन मागे घेतल्याचं सरनाईक यांनी जाहीर केलं.

राज्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी दूधभेसळ अधिनियम तयार करायचं काम सुरू असून त्यात भेसळीच्या गंभीरतेनुसार ६ महिने ते आजन्म तुरुंगवास आणि १० लाख रुपयांच्या दंडाची तरतूद प्रस्तावित आहे, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानपरिषदेत लेखी उत्तराद्वारे दिली. मिलिंद नार्वेकर यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

मुंबईत १२ हजार ५५२ पागडी इमारतींमध्ये सुमारे ४ लाख लोक राहतात. सरकार त्यांना पक्की, सुरक्षित घरं उपलब्ध करून देण्यासाठी वचनबद्ध आहे, अशी ग्वाही मंत्री शंभुराज देसाई यांनी आज विधानपरिषदेत दिली. प्रसाद लाड आणि इतरांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती.

वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ मार्गिकेच्या कामादरम्यान मुलुंड पश्चिम इथं संरक्षण कठडा कोसळून एकाचा मृत्यू, तर तिघे जखमी झाल्याप्रकरणी सल्लागार कंपनीच्या दोन आणि कंत्राटदाराच्या तीन अशा ५ जणांना अटक केली असून कंत्राटदाराला ५ कोटी रुपये, तर सल्लागाराला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज लेखी उत्तराद्वारे विधानपरिषदेत दिली. प्रसाद लाड यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

<><><><><><>

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार तसंच मत्स्योत्पादन, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांनी मंत्रिमंडळातल्या आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे.

<><><><><><>

विधानपरिषदेच्या नाशिक मतदारसंघातले नवनिर्वाचित सदस्य गोकुळ गिते यांनी काल शिवसेनेचं सह सदस्यत्व स्वीकारलं. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पत्रकारपरिषदेत त्यांनी ही घोषणा केली.

नाशिक मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव करून गिते निवडून आले आहेत, आता ते शिवसेनेचेच सहसदस्य म्हणून विधानपरिषदेत काम करतील.

<><><><><>

शेतकऱ्यांचा थेट सहभाग वाढवण्यासाठी खरेदी प्रक्रियेत मध्यस्थांची भूमिका संपवावी लागेल, असं आवाहन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी केलं. नवी दिल्लीत अटल अक्षय उर्जा भवनात नाफेडच्या 'NAFEX.in' या लिलाव पोर्टलचं उद्घाटन करताना ते बोलत होते. किमान आधारभूत किमतीचा संपूर्ण लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी कडधान्यं आणि तेलबियांची खरेदी अधिकाधिक प्रमाणात शेतकऱ्यांकडूनच केली जावी, असंही ते यावेळी म्हणाले. १२ वर्षांपूर्वी गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करणारी नाफेड ही संस्था आज देशातल्या सुमारे ७४ लाख शेतकऱ्यांना मदत करत आहे. 'नाफेड'ची उलाढाल आता ३० हजार कोटी रुपये असून नफा सुमारे ५०० कोटी रुपये असल्याचं शहा यावेळी म्हणाले.

गेल्या १२ वर्षांत कृषी उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली असून २०१४च्या तुलनेने त्यात ४४ टक्के वाढ झाल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले. खरेदी प्रक्रिया पारदर्शक आणि शेतकरी-स्नेही बनवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याबद्दल त्यांनी 'नाफेड' आणि 'नॅशनल को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर्स फेडरेशन' च्या चमूचं त्यांनी अभिनंदन केलं.

<><><><><>

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर हवामान बदल आणि त्याचा शेतीवर पडणारा प्रभाव यासंदर्भात आढावा बैठक घेतली.

या बैठकीत विविध राज्यांचे कृषिमंत्री, सचिव, जिल्हाधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

राज्यात रेंगाळलेला मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून, येत्या दोन दिवसांत तो मुंबईसह राज्याच्या आणखी काही भागांत पुढे सरकण्यासाठी हवामान अनुकूल बनलं आहे. मान्सूनची उत्तरी सीमा सध्या हर्णे ते सोलापूर रेषेवर स्थिरावलेली असली, तरी अरबी समुद्रातील बदलत्या स्थितीमुळे आज आणि उद्या दक्षिण कोकण किनारपट्टी भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर कोकण, मुंबई आणि ठाणे परिसरात ढगाळ हवामानासह जोरदार सरी पडण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात अद्याप मोठ्या मान्सून पावसाची प्रतीक्षा असली, तरी दुपारनंतर विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज आहे. समुद्रात वेगवान वारे वाहणार असल्यानं मच्छीमारांनी २६ जूनपर्यंत समुद्रात जाऊ नये, असं आवाहन हवामान विभागानं केलं आहे.

मुंबईमधे पावसाने आज हजेरी लावली.

रत्नागिरी जिल्ह्यात पावसाला दमदारपणे सुरुवात झाली आहे. काही ठिकाणी झाडं पडली, तसंच काही ठिकाणी महामार्गावर पाणी साचल्याच्याही घटना घडल्या. रत्नागिरी तालुक्यात अधूनमधून प्रचंड जोरदार सरी कोसळत असल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे.

पालघर जिल्ह्यात आज सकाळपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. अनेक दिवसांपासून जाणवत असलेल्या कडक उकाड्यानंतर वातावरणात सुखद गारवा निर्माण झाला.

<><><><><>

धुळे शहर विधानसभा मतदारसंघातल्या मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षण मोहिमेवर भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने गंभीर प्रश्न उपस्थित करत चौकशीची मागणी केली आहे. या मोहिमेदरम्यान, मतदारसंख्येत झालेली संशयास्पद वाढ, संभाव्य बोगस नोंदी तसंच पडताळणी प्रकियेतल्या पारदर्शकतेवर शिष्टमंडळाने प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. या प्रकरणी जिल्हा प्रशासनाने त्वरित स्वतंत्र चौकशी करावी अशी मागणीही या शिष्टमंडळाने केली आहे.

<><><><><>

कोलकाता इथं १९९३मधे झालेल्या बोबाझार बॉम्बस्फोट प्रकरणातला दोषी मोहम्मद रशीद खान याच्या सुटकेला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली.

<><><><><>

बीड जिल्ह्यात केज तालुक्यात झालेल्या विलास घुले हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ बीड शहरात घुले यांच्या नातेवाईकांनी रास्ता रोको आंदोलन केलं.

//<><><><><>//